नियमित दिवाणी दावा क्र.६१/२०२१
आय.ए.क्र.६/२०२२

आदेश निशाणी क्र. ७१ वर

1. प्रतिवादी क्र. १ यांनी सदरचा अर्ज दावा निकाली होणेबाबत आदेश होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

2. प्रतिवादी क्र.१ असे कथन करतो की, प्रतिवादी क्र. ११ ते १४ रितसर कोणतेही स्टेप्स अनेक दिवस वादीने घेतलेले नाही. सबब त्यांचे विरुध्द दावा निकाल होणेबाबत योग्य ते आदेश व्हावेत अशी विनंती केली आहे.

3. वादीने म्हणणे देवून अर्जास हरकत नोंदविली. प्रतिवादी क्र.११ यास समन्सची बजावणी न केलेचा रिपोर्ट न्यायालयात आलेला आहे. सदर रिपोर्ट मध्ये प्रतिवादी क्र.११ हा वयोवृध्द असल्यामुळे बजावणी होवू शकली नाही असे नमूद केले आहे. सबब प्रतिवादी क्र.११ यांचेबाबत एकतर्फा आदेश होणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.१४ हे परगावी राहत असल्याबाबत रिपोर्ट आलेला आहे. सदर प्रतिवादी रहात असलेला पत्ता उशीरा मिळाल्यामुळे दाव्याचे कामी नवीन पत्यावर समन्स काढणेकामी अर्ज दिलेला आहे. सबब प्रतिवादीचा अर्ज हा नामंजूर करण्यात यावा. प्रतिवादीस अशा स्वरुपाचा अर्ज देण्याचा कोणताही व कसलाही अधिकार नाही. सबब प्रतिवादीचा अर्ज कायदेशीर नाही, टेनेबल नाही. तसेच दरम्यानचे कालावधीत कोरोना परिस्थितीमुळे कामकाज चालू न शकल्यामुळे प्रतिवादीस समन्स काढणेस विलंब झालेला आहे. दावा स्थावर मिळकती संदर्भातील असल्यामुळे सदरचा प्रतिवादीस समन्स काढणेस झालेला विलंब माफ करण्यात येवून प्रतिवादीस समन्स काढणेत यावे अशी विनंती केली.

4. प्रतिवादी क्र.१ ने अर्जात असे नमूद केले आहे की, प्रतिवादी क्र. ११ ते १४ विरुध्द रितसर कोणतेही स्टेप्स अनेक दिवस वादीने घेतलेले नाही. सबब त्यांचे विरुध्द दावा निकाल होणेबाबत योग्य ते आदेश व्हावेत. परंतु वादी आज हजर आहे. या प्रतिवादींविरुध्द स्टेप्स घेणेस तयार आहेत. वादीचे वकिलांनी दरम्यानचे कालावधीत कोरोना परिस्थितीमुळे कामकाज चालू न शकल्यामुळे प्रतिवादीस समन्स काढणेस विलंब झालेला आहे असे कथन केले आहे. दावा स्थावर मिळकती

संदर्भातील असल्यामुळे सर्व पक्षकारांचे हक्क व हितसंबंध अबाधीत राहणेसाठी व गुणागुणांवर निर्णित होणेसाठी न्यायाच्या दृष्टीने वादीला प्रतिवादीविरुध्द नोटीस काढणेस संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

आ दे श

1. प्रतिवादी क्र. १ चा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

सही/-

दि. १५/०४/२०२२

( अर्चना श्रीपत नलगे )

२ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/ Order is same word to word as per the original Judgment.

| | |
|---|---|
| a Name of the Stenographer | : Shirsikar V.G. |
| b Court | : 2nd Jt. Civil Judge S.D.Pandharpur |
| c Date of Judgment | : 15/04/2022 |
| d Judgment signed by P.O. On | : 15/04/2022 |
| e Judgment uploaded on | : 15/04/2022 |